महाराष्ट्र टाइम्स
महामुंबई
१८ मार्च २००९ मुंबई

# डॉडसन लिंडब्लाम हायड्रोपावर प्रा. ली.

(पंजीकृत कार्यालय : ६, शिववास्तु, तेजपाल स्किम, रोड नं ५, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७ )
संकेत स्थळ : www.dlz.com

## जाहिर सूचना

डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीने भंडारदरा जलविद्युत प्रकल्प-२ (३४ मे. वॅ.) च्या प्रकरणी वीजदर निश्चिती करण्यासाठी केलेल्या याचिकेवर सूचना आणि हरकती मागवण्याकरिता (प्र. क्र. २७/२००८)

१. डॉडसन लिंडब्लाम हायड्रोपावर प्रा. ली. कंपनीने भंडारदरा जलविद्यूत प्रकल्प-२ (३४ मे. वॅ.) च्या प्रकरणी वीजदर निश्चिती करण्यास मंजूरी मिळवण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ यातील तरतुदी आणि आयोगाचे (वीजदराच्या अटी व शर्ती ) विनियम २००५ या खाली याचिका सादर केलेली आहे. मा. आयोगाने सदर याचिका दिनांक १३ मार्च २००९ ला दाखल करुन घेतली आहे आणि अधिनियमाचे कलम ६४ (२) या खाली डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीने या सूचनेद्वारे जनतेकडून सूचना आणि हरकती मागवण्याकरीता जाहिर सूचना प्रसिध्द करावी, असे निर्देश दिले आहेत.

२. खालील दस्तऐवजांच्या प्रती डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीच्या खालील नमुद केलेल्या कार्यालयात लेखी विनंती केली असता मिळू शकतील.
- मुख्य याचिकेची प्रत आणि जोडपत्र A ते H (रु. ५०/- रोखीने दिल्यास)
- जोडपत्र I ते IX च्या प्रति (रु. १००/- रोखीने जास्तीचे दिल्यास)

पंजीकृत कार्यालय : ६, शिववास्तु, तेजपाल स्किम, रोड नं ५, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७
दूरध्वनी क्र : ०२२-२६८२६८१९/२६८२६७१८

३. डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. या जाहिर सूचनेद्वारे उक्त याचिके संबंधात जनतेकडून सूचना आणि हरकती मागवाव्यात, असे मा. आयोगाचे निर्देश आहेत. जनतेने आपल्या सूचना / हरकती मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५ (फॅक्स क्र. २२१६३९७६) (ई मेल: mercindia@mercindia.org.in) या पत्त्यावर गुरवार दि. ९ एप्रिल २००९ पर्यंत पाठवाव्यात. त्यासोबतच याचिकाकर्ता डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीला सुध्दा पाठविल्याचा पुरावा आयोगाला पाठवावा.

४. सूचना आणि हरकती दाखल करु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने इंग्रजी किंवा मराठी भाषेतील सहा प्रती, त्यांवर प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व असल्यास ई मेल पत्ता यासहित गुरवार दि. ९ एप्रिल २००९ पर्यंत पाठवाव्यात. एखाद्या संघटनेच्या किंवा ग्राहक वर्गाच्या वतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. प्रेषकास आयोगापुढील जाहिर सुनावणीस व्यक्तिश: उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास तेही नमूद करावे. अशा व्यक्तिस आयोगाकडून आयोगाचे कार्यालय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५. गुरवार दि. १६ एप्रिल २००९ सकाळी ११:०० वाजता या ठिकाणी करण्यात येणाऱ्या सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्याकरिता निराळी सूचना दिली जाणार नाही.

५. गुरवार दि. ९ एप्रिल २००९ पर्यंत प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकती यांना डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीकडून तीन दिवसात परंतु सोमवार दि. १३ एप्रिल २००९ पूर्वी उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर आक्षेपक त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहिर सुनावणीच्या वेळी किंवा उशीरात उशीरा बुधवार दि. २२ एप्रिल २००९ पर्यंत दाखल करु शकतात.

६. तपशीलवार याचिकेचे दस्तऐवज आणि प्रस्तावाचा सारांश डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली. कंपनीच्या वेबसाईटवर www.dlz.com उपलब्ध आहे व प्रस्तावाचा सारांश आयोगाच्या वेबसाईटवर सुद्धा (http://www.mercindia.org.in) डाऊनलोड करणे योग्य स्वरुपात विनामुल्य उपलब्ध आहे.

उदय सामंत
डायरेक्टर (वित्त), डॉ. लिं. हा. पा. प्रा. ली.